## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :-

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०७/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंम-+ाल/६-अ/प्र.क्र.१५/२०१३/जा.१९०, दिनांक १३/०३/२०१३ व २१/०३/२०१३.

३) उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचा दिनांक २०/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

४) मे. शिवम ऑईल डेपोचे मालक तथा परवानाधारक प्रविण शिवजी दामा यांचे दिनांक ०२/०४/२०१३ रोजीचे निवेदन.

५) या कार्यालयाची पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१३/जा.४८०, दिनांक २९/०५/२०१३

६) उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचा दिनांक १७/०६/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

७) सार्वजनिक आरोग्य खाते, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे पत्र क्र. पी/१०६९/२०१३, पी/१०७०/२०१३, पी/१०७१/२०१३ अन्वये दक्षता शाखेकडून दिनांक २७/०६/२०१३ रोजी प्राप्त पृथःकरण अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१३/जा. ५९७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : 02 / 07 /२०१३.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २७/०२/२०१३ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांच्या अधिपत्त्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. शिवम ऑईल कंपनी, शॉप नं. ३, आर.बी. शुक्ला चाळ, खोतकुवा रोड, मालाड (पूर्व), मुंबई - ९७ येथे सायंकाळी १७:३० उपस्थित झाले. तद्नंतर उपस्थित अधिकाऱ्यांनी मे. शिवम ऑईल कंपनीत उपस्थित असलेल्या इसमास पंचासमक्ष त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्याचे नाव महेश शिवजी दामा

असे सांगून सन डिसेंबर, २००९ पासून याठिकाणी खाद्यतेल खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच दिनांक १६/०१/२०१३ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचे कार्यालयात अनुज्ञप्ती मिळण्यासाठी अर्ज केला असल्याचे महेश शिवजी दामा यांनी सांगितले. अधिकाऱ्यांनी दुकानात असलेला साठा तपासणीसाठी साठापुस्तकाची मागणी केली असता, साठा पुस्तक प्रमाणीत केले नसल्याचे अधिकाऱ्यांना आढळून आले. साठापुस्तकात दिनांक ०१/०४/२०१२ ते २७/०२/२०१३ या कालावधीत खाद्यतेलाच्या केलेल्या खरेदी, विक्री व शिल्लकबाबतच्या नोंदी आढळून आल्या. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष दिनांक २७/०२/२०१३ अखेर साठापुस्तकाप्रमाणे दुकानात असलेल्या शिल्लक खाद्यतेलाची मोजणी केली असता, राई तेल ७ किलो, राईस ब्रॅन २२५ किलो, सनफ्लावर तेल २४१ किलो, कॉटन सिडस् १२८०० किलो, शेंगदाणा तेल ४९४ किलो, पामतेल १३६३५ किलो व वनस्पती तुप १०५ किलो हा साठा आढळून आला.

साठापुस्तकात नमुद केलेला साठा व आढळलेला प्रत्यक्ष साठा यामध्ये खालीलप्रमाणे वध/घट आढळून आली.

| अ.क्र. | खाद्यतेलाचा प्रकार | साठा (किलोमध्ये) |
|---|---|---|
| १ | सनफ्लावर तेल | ३१ जादा |
| २ | शेंगदाणा तेल | २०९ जादा |
| ३ | कॉटन सिडस् | १४५ कमी |
| ४ | पामतेल | १५० कमी |

साठ्यामध्ये आढळून आलेल्या वध/घटीबाबत अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष महेश शिवजी दामा यांना विचारणा केली असता, दुकानात उपलब्ध असलेल्या साठवणूक टाक्यांचे वजनमापे प्रमाणपत्र त्याला मिळाले नसल्याचे त्यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष साठ्यापुस्तकातील दिनांक २०/०२/२०१३ रोजी १५ किलो क्षमतेचे २५ डबे एकूण वजन ३७५ किलो वनस्पती तुप मिळाल्याची नोंद असलेले आवक बिल तपासणीसाठी मागितले असता, सदर बिल त्याच्याकडे उपलब्ध नसून दोन दिवसात ते बिल सादर करतो, असे पुढे सांगितले.

सन २००९ पासून अर्ज करेपर्यंतच्या कालावधीत महेश शिवजी दामा यांनी विनाअनुज्ञप्ती खाद्यतेलाची खरेदी, साठवणूक व विक्री केल्याचे आढळल्याने तसेच उपलब्ध साठ्यामध्ये वध/घट आढळल्याने साठा जप्त केला. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे,

| अ.क्र. | खाद्यतेलाचा प्रकार | प्रत्यक्ष शिल्लक (किलोमध्ये) | किंमत |
|---|---|---|---|
| १ | राई तेल | ७ | ७३५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | राईस ब्रॅन | २२५ | १५,६००/- |
| ३ | सनफ्लावर तेल | २४१ | २०,४०५/- |
| ४ | कॉटन सिडस् | १२८०० | ८,३२,०००/- |
| ५ | शेंगदाणा तेल | ४९४ | ७९,०४०/- |
| ६ | पामतेल | १३६३५ | ७,७७,१९५/- |
| ७ | वनस्पती तुप | १०५ | ५,४६०/- |
| | एकूण | २७५०७ | १७,३०,४३५/- |

तद्नंतर अधिकाऱ्यांनी जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाच्या साठ्यातील पामतेल, कॉटन सिडस् व शेंगदाणा तेलाचे नमुने घेऊन पंचांसमक्ष सर्व नमुने सिलबंद केले. सनफ्लावर ऑईल व वनस्पती तुप साठा हवाबंद डब्यामध्ये असल्यामुळे त्यांचे नमुने घेण्यात आले नाहीत. जप्त करण्यात आलेला साठा पुढील आदेशापर्यंत सुपूर्दनाम्याद्वारे महेश शिवजी दामा यांना पंचांसमक्ष सूपूर्द करुन साठा सुरक्षित व सुस्थितीत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांची असून तसे न केल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशिर कारवाई केली जाईल याचेही समज त्यांना देण्यात आली. सुपूर्दनाम्याद्वारे प्राप्त झालेला सर्व साठा सुरक्षित, सुस्थितील व जैसे थे ठेवण्याची हमी महेश शिवजी दामा यांनी दिली.

अशाप्रकारे, मे. शिवम ऑईल कंपनीने विविध खाद्यतेल व वनस्पतीचा साठा हा मोठया प्रमाणात विनापरवाना तसेच साठेबाजी करण्याच्या उद्देशाने साठवणूक करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने त्यांनी महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसंन्सिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहून उपरोक्त नमूद खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तूंचा साठा महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ चे कलम १५ (सी) अन्वये घटनास्थळी जप्त केला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १९/०३/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

दिनांक १९/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस परवानाधारक अथवा त्यांचे वतीने कोणीही प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०२/०४/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. शिवम ऑईल ट्रेडींगचे मालक महेश शिवजी दामा यांना पाचारण केल्यानुसार ते उपस्थित राहिले. तथापी, त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले नाही. परंतू सदर सुनावणीस प्रविण शिवजी दामा नामे इसम यांनी उपस्थित राहून ते मे. शिवम ऑईल डेपोचे मालक तथा परवानाधारक असल्याचे सांगून त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले.

उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांच्या अहवालांचे अवलोकन करता, मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचे मालक महेश शिवजी दामा असून मे. शिवम ऑईल डेपोचे मालक हे प्रविण शिवजी दामा आहेत. त्यापैकी प्रविण शिवजी दामा यांनी नमूद पत्त्यावर मे. शिवम ऑईल डेपो या नावे खाद्यतेलाचा परवाना सद्य:स्थितीत धारण केला असून मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचे मालक महेश शिवजी दामा यांनी त्याच पत्त्यावर वेगळ्या व्यवसायीक नावाने नविन परवान्यासाठी अर्ज सादर केल्याने अर्ज निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते. सदर तपासणीमध्ये मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचा खाद्यतेलाचा साठा जप्त असून तपासणीमधील कागदपत्रांचे अवलोकन करता खाद्यतेलाचे खरेदी बिलेही मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीच्या नावे आहेत. यावरुन जप्त साठ्याशी मे. शिवम ऑईल डेपोचे मालक प्रविण शिवजी दामा यांचा काहीही संबंध नसल्याचे दिसून येते.

सबब, मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचे मालक महेश शिवजी दामा यांनी नविन परवान्यासाठी सादर केलेल्या विहित नमुन्यातील अर्ज व त्यासोबतच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती तसेच सदरचा अर्ज निकाली काढण्यात आला असल्याने त्याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांच्या स्वंयस्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करण्याबाबत त्यांना वाचावे क्र. ५ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले. तद्नंतर वाचावे क्र. ६ अन्वये उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांनी अहवाल सादर केला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे पत्र क्र. पी/१०६९/२०१३ अन्वये प्राप्त झालेल्या पृथ:करण अहवालामध्ये, " as per referred to above test, the sample of oil conforms to the standards of refined palm oil, prescribed under regulation 2.2.1 (20) of chapter 2 of food safety & standards (food product & food additives) regulation 2011", असे नमूद आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे पत्र क्र. पी/१०७०/२०१३ अन्वये प्राप्त झालेल्या पृथ:करण अहवालामध्ये, " as per referred to above test, the sample of oil conforms to the standards of cottonseed oil, prescribed under regulation 2.2.1 (2) of chapter 2 of food safety & standards (food product & food additives) regulation 2011", असे नमूद आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे पत्र क्र. पी/१०७१/२०१३ अन्वये प्राप्त झालेल्या पृथ:करण अहवालामध्ये, " as per referred to above test, the sample of oil conforms to the standards of groundnut oil, prescribed under regulation 2.2.1 (3) of chapter 2 of food safety & standards (food product & food additives) regulation 2011", असे नमूद आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांनी दिनांक २०/०३/२०१३ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या अहवालांत, मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनी या व्यापारी नावाने महेश शिवजी दामा यांनी घाऊक व्यापार अनुज्ञाप्तीसाठी दिनांक १६/०१/२०१३ रोजी कार्यालयास अर्ज सादर केला असुन, तपासणीअंती शिधावाटप कार्यालयाने सादर केलेल्या अहवालात एकाच पत्त्यावर एकाच अनुसूचित वस्तूसाठी दोन स्वतंत्र व्यक्तीच्या नावे अनुज्ञाप्ती देणे योग्य नसल्याने सदरहू अर्ज निकाली काढणेबाबत कळविले आहे. तसे संबंधितांना परिमंडळ स्तरावर पत्र देऊन प्रकरण निकाली काढण्यात आले आहे. तसेच शिवम ऑईल डेपो या नावाने प्रविण शिवजी दामा यांना ४२-ग-घाऊक खाद्यतेल-११, अनुज्ञाप्ती क्रमांक ४३१५, दिनांक १३/०२/२००९ रोजी वितरीत असून, दिनांक ३१/१२/२०१३ पर्यंत वैध असल्याचे अभिलेखी नोंद आहे, असे नमूद आहे.

दिनांक ०२/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. शिवम ऑईल डेपोचे मालक तथा परवानाधारक प्रविण शिवजी दामा यांनी सादर केलेल्या निवेदनात, त्यांचे कंपनीचे नावे शिवम ऑईल डेपो करीता लायसन्स असुन वडीलांनी ते कोठे ठेवले आहे ते सापडत नाही. परंतु लायसन्स २०१३ पर्यंत रिनियु आहे व त्याच लायसन्स वर तो व्यवहार करीत आहे. लायसन्स सापडताच आपल्या समोर आणून दाखवीन. नंतर अशी चुक होणार नाही याची काळजी घेणार तरी माफ करावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचे दिनांक १७/०६/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनी, शॉप नं. ३, आर.बी. शुक्ला चाळ, खोजकुवा रोड, मालाड (पु.) या व्यवसायाच्या नावाने महेश शिवजी दामा यांचा घाऊक व्यवसायांकरिता दि.१६/०१/२०१३ रोजी विहित अर्ज सादर केला आहे. तथापी, सदरहू अर्ज दि.१६/०३/२०१३ रोजीचे परिमंडळाचे पत्रानुसार निकाली काढण्यात आला. मे. शिवम ऑईल डेपो, शॉप नं. ३, आर.बी. शुक्ला चाळ, खोजकुवा रोड, मालाड (पु.) या व्यवसायाच्या नावाने प्रविण शिवजी दामा यांना अनुज्ञप्ती क्रमांक ४२ ग (घा) खाद्यतेल ११ दि.३१/१२/२०१३ पर्यंत विधीग्राह्य असून अनुज्ञप्ती दिनांक १३/०२/२००९ रोजी वितरीत केलेली आहे. मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचे मालक महेश शिवजी दामा यांनी नविन अनुज्ञप्ती करीता सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रतीचा तपशिल पुढीलप्रमाणे, १) महेश शिवजी दामा यांच्या नविन अनुज्ञप्ती करिता दि.१६/०१/२०१३ रोजीचा अर्ज. २) महेश शिवजी दामा यांचे नोटरीकृत मुद्रांक पत्र क्र. जीएस ६३४१५१ वरील मुळ निवेदन पत्राची छायाप्रत. ३) महेश शिवजी दामा यांचे नावे असलेले आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र (३१.१२.२०१५ पर्यंत वैध). ४) महेश शिवजी दामा यांचे नावे असलेले महानगरपालिका कृत आरोग्य खात्याचे परवांना क्रमांक ७६१४१५५३४ (दि.३१.१२.२०१३ पर्यंत वैध). ५) महेश शिवजी दामा यांचे नावे असलेला अर्ज क नुसार फुड सेफ्टी ॲन्ड स्टॅण्डर्ड ऑथरिटी ऑफ इंडिया कृत परवाना क्रमांक ११५१२००७०००४९९ (१४.०३.२०१३ पर्यंत वैध). ६) महेश शिवजी दामा यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्र टीआयएन क्रमांक २७०४०७०६६८ व्ही. ७) महेश शिवजी दामा यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्र (सेंट्रल) : २७०४०७०६६८ सी. ८) अनामत पावती क्र. २४ छायांकित प्रत श्री. भानुशाली शिवजी प्रधान यांचे नावे असलेली. ९) महेश शिवजी दामा यांचे नावे असलेले माहे डिसेंबर, २०१२ रोजीचे विद्युत देयक. १०) भाडे करारनामा मुद्रांक पत्र क्रमांक ८९१९६६. सदरहू कागदपत्रांवर शॉप नं. ६, आर बी शुक्ला चाळ, खोजकुवा रोड, मालाड (पु.) हा पत्ता नमुद आहे. सदरहू पत्त्यावर प्रविण शिवजी दामा यांचे नावे मे. शिवम ऑईल डेपो या व्यापारी नावे अनुज्ञप्ती यापूर्वीच कार्यान्वित असल्याने शिधावाटप कार्यालय क्र. ४२ ग यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ४२ग/परवाना/२०१३/जा.क्र.६३८-अ, दि.१४/०३/२०१३ तसेच परिमंडळ कार्यालयाचे पत्र क्र. गप/परवाना/२०१३/२१/प्र.क्र.१३/जा.क्र.१४०२, दि.१६/०३/२०१३ अन्वये अर्जदारास म्हणजे महेश शिवजी दामा यांना त्यांचा अर्ज निकाली काढण्यात आला याबाबतचे पत्र दिले असून, त्या पत्रांच्या छायाप्रत सोबत जोडत आहे. दरम्यानच्या कालावधीत अनुज्ञप्तीधारक प्रविण शिवजी दामा यांनी त्यांच्या कार्यालयात दि.११.०६.२०१३ रोजी उपस्थित राहून त्यांचेकडील अनुज्ञप्ती क्रमांक ४२ ग (घाऊक) खाद्यतेल-११ (दि.३१/१२/२०१३ पर्यंत वैध) मुळ प्रत उपलब्ध झाल्याचे सांगून

CONTROLLER OF RATIONING ... HEAD ... MUM

सदर अनुज्ञप्ती त्यांचे बंधु महेश शिवजी दामा त्यांचे नावे भागीदार म्हणून करण्यात यावी, अशी विनंती करुन लेखी अर्ज सादर केलेला आहे. सदर विवेचन पहाता, पुढील बाबी निदर्शनास येतात. १) अनुज्ञप्तीधारक प्रविण शिवजी दामा व नवीन अनुज्ञप्तीसाठी सादर केलेल कागदपत्रधारक महेश दामा हे एकाच कुटुंबातील असून नात्याने भाऊ आहेत. २) अनुज्ञप्ती वरील व्यवसायाचा पत्ता व महेश दामा करीत असलेल्या व्यवसायाचा पत्ता एकच आहे. ३) सदरचा व्यवसाय प्रविण दामा व महेश दामा हे दोघे बंधु एकत्र करीत असून अनुज्ञप्ती व्यतिरिक्त इतर सर्व अनुषंगिक प्रमाणपत्र/कागदपत्र महेश दामा यांचे नावे करुन घेण्यात आलेली आहे. सदर बाबींच्या अनुषंगाने, अनुज्ञप्तीमध्ये अनुज्ञप्तीधारकाचे बंधु महेश दामा यांचे भागीदार म्हणून नाव समाविष्ट करणे उचित राहिल, असे त्यांच्या कार्यालयाचे मत आहे, असे नमूद केले आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २७/०२/२०१३ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. शिवम ऑईल कंपनी, शॉप नं. ३, आर.बी. शुक्ला चाळ, खोतुकुवा रोड, मालाड (पूर्व), मुंबई - ९७ येथे तपासणी केली. सदर तपासणीमध्ये महेश शिवजी दामा हे सन डिसेंबर, २००९ पासून सदर ठिकाणी खाद्यतेल खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत असल्याचे पथकास दिसुन आले. दिनांक १६/०१/२०१३ रोजी सदर व्यवसायासाठी परिमंडळ कार्यालयास अनुज्ञप्ती मिळण्यासाठी अर्ज केला असल्याचे आढळले. तपासणी वेळी साठा पुस्तक प्रमाणीत केले नसल्याचे अधिकाऱ्यांना आढळून आले. दिनांक २७/०२/२०१३ अखेर साठापुस्तकाप्रमाणे दुकानात असलेल्या शिल्लक खाद्यतेलाची मोजणी केली असता, सनफ्लावर तेल ३१ किलोचा साठा जादा, कॉटन सिडस् १४५ किलोचा कमी, शेंगदाणा तेल २०९ किलोचा जादा व पामतेल १५० किलो कमी साठा आढळून आला. मे. शिवम ऑईल कंपनीचे मालक महेश शिवजी दामा हे विविध खाद्यतेल व वनस्पतीचा साठा हा मोठया प्रमाणात विनापरवाना तसेच साठेबाजी करण्याच्या उद्देशाने साठवणूक करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने २७५०७ किलो खाद्यतेल/वनस्पतीचा एकूण १७,३०,४३५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

A DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE AI

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ११(१) अन्वये " No licensee or his agent or servant or any other person acting on his behalf shall contravene any of the terms and conditions of the license " असे नमूद आहे.

कलम ११(२) अन्वये " If the Licensing authority is satisfied that any such licensee or his agent or servant or any other person acting on his behalf contravene any of the said terms or conditions, it may, without prejudice to any other action that may be taken against him, by order in writing cancel or suspend his licence either in respect of all scheduled commodities covered by it or in respect of such of close commodities as it may think fit " असे नमूद आहे.

अट क्र. १३ अन्वये " The licensee shall by liable for departmental action, prosecution or both as the case may be for the breach of any condition of this licence or any directions or orders issued by the Government or licensing authority from time to time. " असे नमूद आहे.

प्रस्तूत प्रकरणी, तपासणी पथकामार्फत शॉप नं. ३, आर.बी. शुक्ला चाळ, खोतकुवा रोड, मालाड (पूर्व), मुंबई - ९७ या ठिकाणी घेण्यात आलेल्या तपासणीमध्ये मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनी या व्यवसायीक नावाने खरेदी केलेल्या खाद्यतेल या अनुसुचित वस्तूची विनापरवाना साठवणूक केल्याचे दिसून येते. उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात, नमूद पत्त्यावर दिनांक १३/०२/२००९ रोजी मे. शिवम ऑईल डेपो या नावाने प्रविण शिवजी दामा या परवानाधारकाच्या नावे ४२-ग-घाऊक खाद्यतेल-११, अनुज्ञप्ती क्रमांक ४३१५, वितरीत असून, सदरचा परवाना दिनांक ३१/१२/२०१३ पर्यंत वैध असल्याचे अभिलेखी नोंद आहे. तसेच मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनी या व्यापारी नावाने महेश शिवजी दामा नामे इसमाने घाऊक व्यापार अनुज्ञप्तीसाठी दिनांक १६/०१/२०१३ रोजी त्यांच्या कार्यालयात खाद्यतेलाच्या घाऊक परवान्याकरिता अर्ज सादर केला असुन, तपासणीअंती शिधावाटप कार्यालयाने सादर केलेल्या अहवालात एकाच पत्त्यावर एकाच अनुसूचित वस्तूसाठी दोन स्वतंत्र व्यक्तीच्या नावे अनुज्ञप्ती देणे योग्य नसल्याने सदरहू अर्ज निकाली काढणेबाबत कळविले असल्याने परिमंडळ स्तरावर पत्र देऊन मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनी यांचे प्रकरण निकाली काढण्यात आल्याचे नमूद आहे. उपरोक्त अहवाल पाहता मे. शिवम ऑईल डेपोचे मालक हे नमूद पत्त्यावर व्यवसाय करीत असतानाही त्यांनी पुर्ण संमतीने मे. शिवम ऑईल ट्रेडींग कंपनीचे मालक यांना अनुज्ञप्ती प्राधिकारी यांची दिशाभूल करुन नविन परवाना प्राप्त करुन घेण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे दिसुन येत आहे, यावरुन मे. शिवम ऑईल डेपोचे मालक प्रविण शिवजी दामा यांनी त्यांना देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी व शर्तीचा भंग केला असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

तसेच अनुज्ञप्ती प्राधिकारी यांच्या दिनांक १७/०६/२०१३ रोजी प्राप्त अहवालात, मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचे मालक महेश शिवजी दामा यांनी नविन अनुज्ञप्ती करीता सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी विविध आस्थापनांकडून परवाना/नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. दरम्यानच्या कालावधीत अनुज्ञप्तीधारक मे. शिवम ऑईल डेपोचे मालक प्रविण शिवजी दामा यांनी त्यांच्या कार्यालयात दि.११/०६/२०१३ रोजी उपस्थित राहून त्यांचेकडील अनुज्ञप्ती क्रमांक ४२ ग (घाऊक) खाद्यतेल-११ (दि.३१/१२/२०१३ पर्यंत वैध) मुळ प्रत उपलब्ध झाल्याचे सांगून सदर अनुज्ञप्ती त्यांचे बंधु महेश शिवजी दामा त्यांचे नावे भागीदार म्हणून करण्यात यावी, अशी विनंती करुन लेखी अर्ज सादर केलेला आहे. सदर विवेचन पहाता, अनुज्ञप्तीधारक प्रविण शिवजी दामा व नवीन अनुज्ञप्तीसाठी सादर केलेले आवेदक महेश शिवजी दामा हे एकाच कुटुंबातील असून अनुज्ञप्ती वरील व्यवसायाचा पत्ता व महेश शिवजी दामा यांनी नविन परवान्याकरीता केलेल्या अर्जातील व्यवसायाचा पत्ता एकच आहे, असे नमूद केले आहे.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत. शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत. त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक असल्याचे नमूद आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम 3 (a) अन्वये " a person holding an existing licence for carrying on business as a wholesale dealer in any of the scheduled commodities may continue to do so without a licence till the expiry of 90 days from the commencement date. " असे नमूद आहे.

कलम 3 (b) अन्वये " a person referred to in clause (a) who applies for a licence before the expiry of period referred to in clause (a) or a licensee who applies for the renewal of his licence in accordance with the provisions of clause 6 may till his application is rejected continue to carry on business as a whole dealer without a licence in the scheduled commodities in respect of which he has applied for licence or for renewal thereof. " असे स्पष्ट नमूद आहे.

प्रस्तूत प्रकरणी, उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील पुरावादर्शक कागदपत्रे तसेच वरील नमूद आदेशामधील तरतुदींचे अवलोकन करता, महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ हे

आदेश कार्यान्वित करताना शासनाने कलम ३ (a) अन्वये घाऊक परवानाधारकास नविन अंमलात आलेल्या अनुज्ञप्ती आदेशानुसार परवाना प्राप्त करुन घेईपर्यंत त्यापुढील ९० दिवसांकरीता व्यवसाय करण्यास सुट देण्यात आल्याचे नमूद आहे. तसेच कलम ३ (b) अन्वये विहीत केलेल्या ९० दिवसांच्या आत सदर आदेशान्वये नविन परवान्यासाठी अर्ज केला असल्यास व परवानाधारकाने नुतनीकरणासाठी अर्ज केले असल्यास त्यांना घाऊक व्यापारी म्हणुन नविन परवाना प्राप्त करेपर्यंत अथवा परवान्याचे नुतनीकरण होईपर्यंत अनुसूचित वस्तुंचे घाऊक व्यवसाय करण्यासाठी मुभा असल्याचे नमूद आहे.

प्रस्तूत प्रकरणी, मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचे मालक महेश शिवजी दामा असून मे. शिवम ऑईल डेपोचे मालक हे प्रविण शिवजी दामा आहेत. त्यापैकी प्रविण शिवजी दामा यांनी नमूद पत्त्यावर मे. शिवम ऑईल डेपो या नावे खाद्यतेलाचा परवाना सद्य:स्थितीत धारण केला असून ते माहे फेब्रुवारी, २००९ पासुन खाद्यतेलाचा नमूद पत्त्यावर घाऊक व्यवसाय करीत असल्याचे दिसुन येते. मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचे मालक महेश शिवजी दामा यांनी त्याच पत्त्यावर वेगळ्या व्यवसायीक नावाने नविन परवान्यासाठी अर्ज सादर करुन या कार्यालयाची तसेच इतर संबंधित प्राधिकरणाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर तपासणीमध्ये मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचा खाद्यतेल व वनस्पतीचा साठा जप्त असून तपासणीमधील कागदपत्रांचे अवलोकन करता खाद्यतेल/वनस्पतीचे खरेदी बिलेही मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीच्या नावे आहेत. मे. शिवम ऑईल डेपोचे मालक प्रविण शिवजी दामा यांचा परवान्यावरील साठ्याबाबत काहीच बोध होत नाही. तसेच मे. शिवम ऑईल डेपो या नावे प्रविण शिवजी दामा यांनी नमूद पत्त्यावर परवाना धारण करुन दोन्ही व्यवसाय एकाच पत्त्यावर कार्यरत ठेवुन त्यांनी अनुज्ञप्ती प्राधिकारी यांची दिशाभूल केली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सदर बाब विचारात घेता, मे. शिवम ऑईल ट्रेडींग कंपनी व मे. शिवम ऑईल डेपो या दोन्ही आस्थापनाचे मालक हे एकाच पत्त्यावर कागदोपत्री व्यवसाय दर्शवुन केवळ साठवणूकीची कमाल मर्यादा वाढवुन मिळावी म्हणुन दोन परवाने धारण करण्याचा अयशस्वी प्रयत्न केल्याचे दिसुन येते. सदर बाब अत्यंत गंभीर असुन सद्यस्थितीत मे. शिवम ऑईल ट्रेडींग कंपनी या नावे नविन परवान्यासाठी केलेला अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

मे. शिवम ऑईल ट्रेडींग कंपनीचे मालक महेश शिवजी दामा यांना नैसर्गिक न्याय म्हणून सुनावणीस पाचारण करुन त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे सादर करण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली आहे. तथापी, त्यांनी सुनावणीस उपस्थित राहून त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे त्यांना जप्त असलेला साठा परत मिळण्यास स्वारस्य नसल्याचे तसेच नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. सदर

CONTROLLER OF RATIONING
HEA
MUM

सुनावणीच्या वेळी प्रविण शिवजी दामा नामे इसम यांनी उपस्थित राहून ते मे. शिवम ऑईल डेपोचे मालक तथा परवानाधारक असल्याचे सांगून त्यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्यांचा मे. शिवम ऑईल डेपो या व्यवसायीक नावे असलेला परवाना सन २०१३ पर्यंत वैध असल्याचे सांगून सदर परवान्यावर ते व्यवसाय करीत असल्याचे सांगितले. उपरोक्त बाब विचारात घेता, मे. शिवम ऑईल डेपोचे मालक प्रविण शिवजी दामा हे जप्त साठ्याच्या मालकीचा दावा करुन अशी चुक पुन्हा होणार नाही असे मोघम स्वरुपाचे निवेदन सादर करुन या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी, कागदपत्रांचे अवलोकन करता जप्त साठ्याची खरेदी बिले व इतर कागदपत्रे हे मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनी या नावे असून सदर साठ्याशी मे. शिवम ऑईल डेपो यांचा काहीही संबंध नसल्याचे दिसून येते. सबब, मे. शिवम ऑईल ट्रेडींग कंपनी यांनी विनापरवाना खाद्यतेल व वनस्पती साठ्याची खरेदी, साठवणूक व विक्री केल्याचे सिद्ध होत असल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केला असल्याचे निष्पन्न होत असल्याने मे. शिवम ऑईल ट्रेडींग कंपनी यांचा जप्त करण्यात आलेला विविध खाद्यतेल व वनस्पतीचा विनापरवाना असलेला संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश :-</u>

१) प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला विविध खाद्यतेल व वनस्पतीचा एकूण २७५०७ किलो साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) उक्त शासनजमा करण्यात आलेला खाद्यतेल व वनस्पतीचा संपूर्ण साठा हा उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांनी वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial

0012

Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

मे. शिवम ऑईल ट्रेडिंग कंपनीचे मालक महेश शिवजी दामा
(उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, ग. परिमंडळ, कांदिवली यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, नविन मंत्रालय, ८ वा मजला, जी.टी. हॉस्पीटल कॉम्प्लेक्स इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.